महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाची स्थापना...
पदाधिका-यांची पदे मंजूर करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक:- मप्रन्या-१०८९/सीआर-३८/१६-अ,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक:- ३१ जुलै १९८९.

शासन निर्णय:-

शासकीय / निमशासकीय कर्मचा-यां [illegible] सेवाविषयक तक्रारींचा विचार करून त्यावर निर्णय घेण्यासाठी प्रशासकीय न्[illegible]ाधिकरण स्थापन करण्याबाबतच्या शासनाच्या निर्णयानुसार नवी मुंबई येथे लवकर [illegible] न्यायाधिकरणाची स्थापना करण्यात येणार आहे. त्यासाठी पदाधिका-यांची पुढे दर्शविलेली चार पदे प्रथमत: दिनांक १ ऑगस्ट १९८९ पासून २८. २. ९० पर्यंतच्या कालावधीकरिता निर्माण करण्यास शासन मंजुरी देत आहे.

अ. क्र.	पदनाम	वेतनश्रेणी [असुधारित]	पदसंख्या	अभिप्राय
१.	अध्यक्ष	रुपये ३५००/- + विशेष वेतन रुपये २५०/-	१	मूळ वेतनाशिवाय नियमाप्रमाणे भत्ते अनुज्ञेय असतील.
२.	उपाध्यक्ष	रुपये २५००/-	१	
३.	सदस्य	रुपये [illegible]/-	२	

२. ह्या पदांवर होणारा खर्च, शासन ज्ञापन, वित्त विभाग क्रमांक-आकनि-११८९/५१/अर्थसंकल्प-१३ दिनांक १५. ७. ८९ नुसार मंजूर करण्यात आलेल्या आकस्मिकता निधीतील रुपये १५, ९६, ०००/- [रुपये पंधरा लक्ष शाण्णव हजार फक्त] च्या अग्रिमातून भागविण्यात यावा आणि तो "अर्थसंकल्पीय [illegible] मागणी क्रमांक ए-९-२०७०-इतर प्रशासकीय सेवा [१०४/२] महाराष्ट्र प्रशासकी[य] न्यायाधिकरण" ह्या खाली खर्ची टाकावा. सदर आकस्मिकता निधीतून घेतलेल्या अग्रिमाच्या प्रतिपूर्तीसाठी आगामी विधान मंडळाच्या अधिवेशनात पूरक मागणी सादर करण्यात येईल.

३. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक सीआर-९४४/व्यय-४, दिनांक २८. ७. १९८९ अन्वये काढण्यात आला आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[signature]
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,
महालेखापाल [लेखा व अनुज्ञेयता] महाराष्ट्र राज्य-१, मुंबई

महालेखापाल [लेखा परीक्षा]महाराष्ट्र राज्य-१, मुंबई,

महालेखापाल [लेखा व अनुज्ञेयता]महाराष्ट्र राज्य-२, नागपूर,

महालेखापाल [लेखा परीक्षा] महाराष्ट्र राज्य-२, नागपूर,

अधिदान व लेखाधिकारी, मुंबई,

निवासी लेखाधिकारी, मुंबई,

विभागीय आयुक्त कोकण विभाग, नवी मुंबई.

जिल्हाधिकारी ठाणे,

जिल्हा कोषागार अधिकारी ठाणे,

प्रशासकीय न्यायाधिकरण कार्यालय, [द्वारा-विभागीय आयुक्त, कोकण विभाग]नवी मुंबई,

सामान्य प्रशासन विभाग/का. २५, २६ व १९,

वित्त विभाग , व्यय-४,

मंत्रालयीन इतर सर्व विभाग,

निवड नस्ती.